# मराठी विश्वकोश

खंड २१

## सूचिखंड

# मराठी विश्वकोश

## खंड २१

## सूचिखंड

प्रमुख संपादक

**दिलीप करंबेळकर**

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ
२०१९

**प्रकाशक :**
सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर, दुसरा मजला, सयानी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

**संपादकीय कार्यालय :**
मराठी विश्वकोश कार्यालय,
वाई-४१२ ८०३ ( जि. सातारा ).

**मुद्रक :**
व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे-४११ ००१.

**सजावट आणि वेष्टन :**
कला विभाग, शासन मुद्रण व लेखनसामग्री
संचालनालय, मुंबई-४०० ००४.

**प्रथम प्रकाशन :**
**२०१९**

**किंमत रु. २५०/-**

© सर्व हक्क महाराष्ट्र शासनाने स्वाधीन ठेवले आहेत.

# प्रस्तावना

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली *मराठी विश्वकोश* निर्मितीचा प्रकल्प सुरू केला. प्रारंभी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अंतर्गत हा प्रकल्प कार्यरत होता. गुढीपाडवा, दि. २ एप्रिल १९६५ रोजी या प्रकल्पाची माहिती देणारा परिचय ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथात *मराठी विश्वकोशा*चे स्वरूप कसे असेल, याचा आराखडा दिला होता. त्या अनुषंगाने १९७३ साली प्रथम परिभाषा खंड प्रकाशित झाला. त्यानंतर या मालिकेतला पहिला संहिता खंड १९७६ साली प्रकाशित झाला. *मराठी विश्वकोश* निर्मितीचे महत्त्व व त्याची व्याप्ती लक्षात घेऊन दि. १ डिसेंबर १९८० रोजी स्वतंत्र अशा 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळा'ची स्थापना करण्यात आली व त्या मंडळाच्या विद्यमाने शेवटचा संहिता खंड : २० हा २०१५ साली प्रकाशित झाला. या वीस खंडांत ११० विषयांवर मिळून १८,२४४ नोंदी आहेत. या खंडांमध्ये रेखाचित्रे, कृष्ण-धवल व रंगीत छायाचित्रे, चित्रे, आलेख, आकृत्या, नकाशे इ. साधनांच्या आधारे वर्ण्यविषय अधिक स्पष्ट व परिणामकारक करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. *मराठी विश्वकोशा*च्या या वीस खंडांनी मराठी भाषेच्या ज्ञानसंपादनात मोलाची भर टाकली आहे. मराठी विश्वकोश ग्रंथरूपाने प्रकाशित करण्याचा पहिला टप्पा पाच अध्यक्ष व प्रमुख संपादक यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाला आहे. हे वीसही खंड आता www.marathivishwakosh.org या संकेतस्थळावर तसेच भ्रमणध्वनी उपयोजकाद्वारे (मोबाईल ॲप) उपलब्ध आहेत.

असे असले तरी, छापील स्वरूपात उपलब्ध असलेल्या *मराठी विश्वकोशा*च्या खंडांचा संदर्भासाठी उपयोग करणाऱ्यांची संख्याही बरीच आहे. अशा सर्व व्यक्तींना या खंडांत आलेल्या सर्व विषयोपविषयांतील तपशीलवार माहिती शोधणे सोयीचे व्हावे, या दृष्टीने सूचिखंड प्रकाशित होत आहे. *मराठी विश्वकोशा*च्या या वीसही खंडांमधील १८,२४४ नोंदी असलेल्या २२,३५८ पृष्ठांतील सुमारे ३ लाख संदर्भ या सूचिखंडाच्या १,१२६ पृष्ठांमध्ये दिले आहेत. या वीसही खंडांत ज्या विशेष नावांचा व शब्दांचा उल्लेख झालेला आहे, त्यांचा संदर्भ शोधण्यासाठी सूचिखंडाचा निश्चित उपयोग होईल. विशिष्ट नावांचा आणि शब्दांचा उल्लेख कोणत्या खंडात आणि कोणत्या पृष्ठावर आहे, याची माहिती सूचिखंडात अकारविल्हे दिली आहे. त्यामुळे सूचिखंडाचा उपयोग करून आपल्याला अनेक नावांनी विखुरलेली माहिती किमान वेळात आणि परिश्रमात मिळणे शक्य होते. हा खंड छापील स्वरूपात व संकेतस्थळावरही उपलब्ध असेल. या सूचिखंडाच्या प्रकाशनाने *मराठी विश्वकोश* निर्मिती प्रकल्पांतर्गत संहिता खंडांच्या पहिल्या टप्प्याची सांगता झाली आहे.

**दिलीप करंबेळकर**
**प्रमुख संपादक तथा अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.**

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

**माजी व विद्यमान अध्यक्ष**
**आणि**
**मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक**

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
(१९ नोव्हेंबर १९६० ते २७ मे १९९४)

**प्रा० मेघश्याम पुंडलीक रेगे**
(४ जून १९९४ ते २८ डिसेंबर २०००)

**प्रा० रा० ग० जाधव**
(१६ जानेवारी २००१ ते १० फेब्रुवारी २००३)

**डॉ० श्रीकांत जिचकार**
(२१ जुलै २००३ ते २ जून २००४)

**डॉ० विजया वाड**
(९ डिसेंबर २००५ ते ८ डिसेंबर २००८ आणि ९ जून २००९ ते ३० जून २०१५)

**दिलीप करंबेळकर**
(१० ऑगस्ट २०१५ पासून कार्यरत)

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

**अध्यक्ष**

दिलीप करंबेळकर

**सदस्य**

श्री० अरविंद जामखेडकर

मेजर जनरल शशिकांत पित्रे

श्री० अरुण फडके

श्री० सुहास बहुलकर

डॉ० श्रीनंद बापट

डॉ० प्रदिप कर्णिक

श्री० दत्तात्रय पाष्टे

डॉ० अरुणचंद्र शं० पाठक

डॉ० वसंत शिंदे

श्री० दिपक जेवणे

डॉ० गौरी माहुलीकर

प्रा० लक्ष्मणराव टोपले

श्री० भगवान इंगळे

श्री० सुरेश वाघे

डॉ० बाळ फोंडके

डॉ० गणपत माने

डॉ० राजशेखर सोलापूरे

डॉ० नीरज हातेकर

श्रीमती आशा बगे

डॉ० अक्षयकुमार काळे

श्री० दीपक घैसास

डॉ० अरुणा ढेरे

डॉ० हेमचंद्र प्रधान (स्वीकृत)

श्री० अजिंक्य कुलकर्णी (स्वीकृत)

श्री० माधव चौंडे (स्वीकृत)

डॉ० भीमराव उल्मेक (स्वीकृत)

डॉ० दिनेश थिटे (स्वीकृत)

**सचिव**

श्रीमती सुवर्णा ग० पवार (सेवानिवृत्त)

श्री० शामकांत बा० देवरे (अतिरिक्त कार्यभार)

# मराठी विश्वकोश

प्रमुख संपादक

**दिलीप करंबेळकर**

सचिव

**श्रीमती सुवर्णा ग० पवार (सेवानिवृत्त)**

**श्री० शामकांत बा० देवरे (अतिरिक्त कार्यभार)**

## मानव्यविद्या कक्षा

**विद्याव्यासंगी सहायक**

डॉ० जगतानंद बा० भटकर

श्री० आनंद ग्या० गेडाम

श्री० सरोजकुमार स० मिठारी

श्री० संतोष ग्या० गेडाम

**संपादकीय सहायक**

श्रीमती वर्षा सु० देवरुखकर

**ग्रंथालयीन सहायक**

श्री० मनोज वि० जोशी

श्री० मनोज दे० गजभिये

## विज्ञान व तंत्रविद्या कक्षा

**विद्याव्यासंगी सहायक**

डॉ. स्नेहा दि० खोब्रागडे

श्री० नितीन भ० वाघ

श्रीमती प्रीती म० साळुंके

श्री० रवीन्द्र बा० घोडराज

**संपादकीय सहायक**

श्रीमती पल्लवी नि० गायकवाड

श्रीमती शिल्पा चं० भारस्कर

## कला कक्षा

**कला सहायक**

श्री० ओंकार सु० भोज

■ ■ ■

# प्र शा स न क क्षा

**सचिव**
**श्रीमती सुवर्णा ग० पवार (सेवानिवृत्त)**
**श्री० शामकांत बा० देवरे (अतिरिक्त कार्यभार)**

**सहायक सचिव**

डॉ० जगतानंद बा० भटकर (प्रभारी : मे २०१८ पर्यंत)

श्री० शामकांत बा० देवरे

**सहायक लेखाधिकारी**

श्रीमती सायली सं० सावंत (ऑगस्ट २०१८ पर्यंत)

श्री० सुनिल अ० मोरे

**अधीक्षक**

श्री० अरुण रा० पवार (सेवानिवृत्त)

श्री० अजय अ० ढगे

**स्वीय सहायक**

श्री० उमाकांत गो० खामकर

**कनिष्ठ-लघुलेखक**

श्री० श्रीराम आ० सांगळे

**वरिष्ठ-लिपिक**

श्री० सुरेश वि० पराते (सेवानिवृत्त)

श्री० ललित दे० कुडमथे

**लिपिक-टंकलेखक**

श्री० सचिन प्र० भाडळकर

श्रीमती विनोदिनी ज० निर्गुण

श्रीमती वर्षाराणी दि० नाईक

श्रीमती शीतल सु० शिंदे

श्री० काशिनाथ झिं० फोपसे

**सहायक**

श्रीमती रेखा अ० निगडे

श्री० राजन ग० करपे

श्री० दीपक प्र० वागळे

श्रीमती हर्षदा सं० रोकडे

**वाहन चालक**

श्री० सुनील व० पाटील

**चतुर्थश्रेणी कर्मचारी**

श्री० कृष्णा ता० बुरकूल (सेवानिवृत्त)

श्री० रमेश शं० कांबळे

श्री० चंद्रकांत आ० माने

श्री० विलास आ० शेलार

श्री० शंकर बा० शिंदे

■ ■ ■

# मराठी विश्वकोश

## खंड २१

### अभ्यागत संपादक

**श्री० श्री० दे० इनामदार,** एम्.ए.; कथाकार, समीक्षक; सेवानिवृत्त विभाग संपादक, मानव्यविद्या कक्षा, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई; सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई; वाई.

**श्रीमती कांचन म० एरंडे,** बी.एस्सी. (प्राणिशास्त्र), वाई.

**श्रीमती शारदा अ० कुंभार,** बी.एस्सी. (रसायनशास्त्र); बी.एड्.; वाई.

**दिवंगत अ० र० कुलकर्णी,** एम्.ए.; कथाकार; सेवानिवृत्त सहसंपादक, मानव्यविद्या कक्षा, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

**श्री० कृ० म० गायकवाड,** बी.ए. (अर्थशास्त्र); सेवानिवृत्त विद्याव्यासंगी सहायक, मानव्यविद्या कक्षा, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

**श्रीमती भक्ती दि० गायकवाड,** बी.सी.ए., वाई.

**श्री० ना० स० गाडे,** बी.ए. (भूगोल); एम्.ए. (हिंदी); सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा.

**श्री० मा० ल० चौंडे,** बी.ए. (भूगोल); सेवानिवृत्त विद्याव्यासंगी सहायक, मानव्यविद्या कक्षा, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई; सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

**प्रा० वसंत चौधरी,** एम्.ए. (भूगोल); एम्.ए. (अर्थशास्त्र); बी.एड्.; सेवानिवृत्त उपप्राचार्य, किसन वीर महाविद्यालय, वाई.

**श्री० अ० ना० ठाकूर,** एम्.एस्सी; बी.ए. (ऑ.); सेवानिवृत्त विभाग संपादक, विज्ञान व तंत्रविद्या कक्षा, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

**श्रीमती सविता अ० ढगे,** बी.ए. (मराठी), वाई.

**श्री० श्री० ग० दीक्षित,** सेवानिवृत्त कार्यालयीन अधीक्षक, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.

**दिवंगत डॉ. सु० र० देशपांडे,** एम्.ए. (इतिहास); बी.एड्; पीएच.डी.; इतिहासकार; माजी विभाग संपादक, मानव्यविद्या कक्षा, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई

**श्री० मंजुषा म० नेने,** जी.सी.डी., वाई.

**श्रीमती मनीषा जा० पोळ,** एम्.ए. (मराठी); सेवानिवृत्त विद्याव्यासंगी सहायक, मानव्यविद्या कक्षा, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

**श्रीमती निलम रा० फरांदे,** एम्.ए. (मराठी), वाई.

**श्री० ज्ञानेश्वर रा० फरांदे,** मेकॅनिकल ड्रॉफ्ट्समन, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

**श्रीमती सुरेखा अ० मगर,** एम्.एस्सी. (प्राणिविज्ञान); बी.एड्., वाई.

**श्री० पां० म० लोंढे,** बी.ए. (मराठी); सेवानिवृत्त सहायक सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

**श्री० वि० ल० सूर्यवंशी,** बी.एस्सी. (भौतिकशास्त्र); सेवानिवृत्त विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

■ ■ ■

# सूचिखंडाविषयी मार्गदर्शन

*मराठी विश्वकोशा*चा २१ वा खंड हा सूचिखंड आहे. *मराठी विश्वकोशा*च्या सर्वविषयसंग्राहक अशा १ ते २० खंडांतील एकूण १८,२४४ नोंदींमधील तपशीलवार माहिती वाचकाला मिळविणे सुलभ होईल, अशी याची योजना व रचना आहे. हा खंड एकूण १,१२६ पृष्ठांचा असून त्यामध्ये *मराठी विश्वकोशा*च्या २२,३५८ पृष्ठांतील सु. ३ लाख निर्देशनोंदींचा समावेश वर्णानुक्रमे तीन स्तंभांमध्ये अकारविल्हे केलेला आहे. *मराठी विश्वकोशा*च्या सर्वच खंडांच्या रचनेसाठी पुढीलप्रमाणे वर्णानुक्रम स्वीकारला आहे. हाच वर्णानुक्रम सूचिखंडातील निर्देशनोंदींचाही आहे.

**अ ॲ आ ऑ इ ई उ ऊ ऋ ऌ**

**ए ऐ ओ औ; ं (अनुस्वार) : (विसर्ग)**

**क ख ग घ ङ; च छ ज झ ञ;**

**ट ठ ड ढ ण; त थ द ध न; प फ ब भ म;**

**य र ल व श ष स ह ळ क्ष ज्ञ**

सूचिखंडातील प्रत्येक पृष्ठाचा मथळा हा पहिल्या स्तंभातील वर्णानुक्रमाने आलेला व समासालगतच असलेला निर्देश आणि तिसऱ्या स्तंभातील शेवटचा निर्देश दर्शवितो.

प्रस्तुत खंडामध्ये तीन प्रकारच्या निर्देशांचा सूची म्हणून समावेश करण्यात आला आहे.

**(१) मुख्य निर्देश**

**(२) पूरक निर्देश**

**(३) स्वतंत्र निर्देश**

**(१) मुख्य निर्देश** (नोंदशीर्षक) **:** *मराठी विश्वकोश* खंड १ ते २० यांमधील नोंदशीर्षकांचा अंतर्भाव मुख्य निर्देश म्हणून करण्यात आला आहे. ती इतर निर्देशनोंदींपासून वेगळी ओळखू यावीत म्हणून ठळक ठशात समासालगत दर्शविली आहेत. त्यांचा खंड व पृष्ठ क्रमांकही ठळक ठशात दिलेला आहे. तसेच अ-आ या स्तंभांचा उल्लेख त्यासमोर केलेला नाही.

उदा., **अंक १.१**

**(२) पूरक निर्देश :** मुख्य निर्देशनोंदींसंदर्भात महत्त्वाचे असे संदर्भ *मराठी विश्वकोशा*मध्ये विविध ठिकाणी आले आहेत. त्यांना पूरक निर्देश म्हणून दर्शविण्यात आले आहे. या सर्व निर्देशांचा मुख्य निर्देशाच्या खाली 'पोटातील निर्देश' म्हणून समासापासून थोड्या अंतरावर वर्णानुक्रमाने अंतर्भाव केला आहे.

पूरक निर्देश तीन प्रकारचे आहेत.

**(अ) स्वतंत्र पूरक निर्देश :** मुख्य निर्देशाच्या संदर्भातील महत्त्वाची माहिती *मराठी विश्वकोशा*तील विविध खंडांमध्ये आलेली आहे. परंतु ज्यांवर *मराठी विश्वकोशात* स्वतंत्र नोंद नाही असे संदर्भ स्वतंत्र पूरक निर्देशाने दर्शविले आहेत. ते मुख्य निर्देशनोंदीखाली साध्या ठशात दिले आहेत.

उदा., **चयापचय** (जीवरसायनशास्त्र) **५.६५१** या मुख्य निर्देशासाठी

जैव ऑक्सिडीभवन **२**.३३७ अ

तापमान संतुलन **७**.२९४ अ

त्वचा विकृती **७**.५५५ आ

या संज्ञा स्वतंत्र पूरक निर्देश म्हणून आल्या आहेत.

**(आ) मुख्य पूरक निर्देश :** मुख्य निर्देशनोंदींच्या संदर्भातील संलग्न माहिती *मराठी विश्वकोशा*तील खंडांमध्ये आहे आणि त्यावर स्वतंत्र नोंदी आहेत, असे निर्देश मुख्य पूरक निर्देश म्हणून दर्शविले आहेत. ते मुख्य निर्देशनोंदीखाली ठळक ठशात दिले आहेत.

उदा., **चयापचय** (जीवरसायनशास्त्र) **५.६५१** या मुख्य निर्देशासाठी

**अभिशोषण १**.३४४ अ

**अवटु ग्रंथि १**.६०३ अ

**ॲमिनो अम्ल १**.७४६ अ

ही नोंदशीर्षके मुख्य पूरक निर्देश म्हणून आलेली आहेत.

**(इ) घटक निर्देश :** मुख्य निर्देशनोंदींमध्ये आलेले उपविषय घटक निर्देश म्हणून नोंदविले आहेत. ते मुख्य निर्देशनोंदीखाली अकारविल्हे साध्या ठशात दिले आहेत. ज्या निर्देशनोंदींची व्याप्ती जास्त पृष्ठांत आहे अशा निर्देशनोंदींना घटक निर्देश दिलेले आहेत.

उदा., **आफ्रिका २.८६** या मुख्य निर्देशाखाली

खनिजसंपत्ती **२**.९१ अ

जलनि:सारण **२**.८८ अ

प्राणी **२**.९३ अ

या संज्ञा घटक निर्देश म्हणून आल्या आहेत.

**(३) स्वतंत्र निर्देश :** ज्या घटकांवर *मराठी विश्वकोशात* स्वतंत्र नोंदी नाहीत; परंतु त्यांविषयी *मराठी विश्वकोशा*मध्ये काही महत्त्वाची माहिती उपलब्ध आहे, अशा निर्देशांचा स्वतंत्र निर्देश म्हणून सूचिखंडात अंतर्भाव करण्यात आला आहे. ते समासालगत साध्या ठशामध्ये वर्णानुक्रमे मुद्रित केले आहेत. त्यांचे उल्लेख ज्या ज्या ठिकाणी आले असतील ते खंडक्रमांक व पृष्ठक्रमांक स्तंभनिर्देशांसह (खंडांमध्ये डावीकडील 'अ' आणि उजवीकडील 'आ' स्तंभ) दिलेले आहेत, जेणेकरून वाचकाला एखाद्या निर्देशाची माहिती तत्परतेने मिळू शकेल. याशिवाय नियतकालिकांची नावे, कलाकृतींची नावे, ग्रंथनामे; प्राणी, वनस्पती इत्यादींची शास्त्रीय नावे तिरप्या ठशामध्ये दिलेली आहेत.

अधिक स्पष्टीकरणार्थ प्रस्तुत सूचिखंडामध्ये खालील पद्धतीने निर्देशांची जी रचना करण्यात आली आहे, ती एकत्रित दिली आहे.

(१) **अंकगणित १.९**

(२) **अंकगणित १.९**

**गणित ४**.८१२ अ-आ

*गणितसारसंग्रह* (ग्रंथ) **१३**.१९ अ

चिन्हे व संज्ञा **४**.८३८ अ (प)

(३) अंकन (विधि) **१३**.७५० अ

क्र. १ मध्ये **१.९** याचा अर्थ **अंकगणित** ही नोंद खंड क्र. **१** व पृ. क्र. ९ वर आहे. **अंकगणित** हा मुख्य निर्देश असल्याने अ-आ या स्तंभांचा उल्लेख केलेला नाही.

क्र. २ मध्ये **अंकगणित** या मुख्य निर्देशासाठी *मराठी विश्वकोशा*च्या इतर खंडांत जे पूरक संदर्भ आले आहेत, त्यांचा निर्देश आला आहे. **गणित ४**.८१२ अ-आ हा जरी मुख्य निर्देश असला तरी, तो **अंकगणित** या निर्देशाला पूरक आहे, त्यामुळे त्याचा उल्लेख येथे आला आहे. त्याचप्रमाणे *गणितसारसंग्रह* (ग्रंथ) **१३**.१९ अ आणि चिन्हे व संज्ञा **४**.८३८ अ (प) या पूरक निर्देशांचा उल्लेख येथे आला आहे.

क्र. ३ मध्ये अंकन हा स्वतंत्र निर्देश आहे. *मराठी विश्वकोशात* अंकन ही स्वतंत्र नोंद नसल्यामुळे त्याचा समावेश येथे स्वतंत्र निर्देश म्हणून वर्णानुक्रमे दिला आहे. या निर्देशाची मांडणी -निर्देश, खंड व पृष्ठ क्रमांक आणि 'अ' व 'आ' स्तंभ अशा क्रमाने केली आहे.

याशिवाय *मराठी विश्वकोशात* अनेक नोंदींच्या विषयविवेचनासाठी चित्रपत्रांची योजना केली आहे. अशा नोंदींचे निर्देश करताना खंड व पृष्ठ क्रमांक व चित्रपत्र क्रमांक दिला आहे. तसेच काही ठिकाणी खंडक्रमांक व चित्रपत्र क्रमांक दिले आहे. चित्रपत्र क्रमांक ठळक व तिरप्या ठशात दिलेला आहे.

उदा., **अंदमान व निकोबार** (बेटे) **१**.७१, ***चि.*७५**

स्वरमंडल (वाद्य) **१५. *चि.* ३३**

या मांडणीबरोबरच (अ) प्रत्येक स्वतंत्र निर्देशाची ओळख वाचकास लगेच व्हावी यासाठी त्याचे स्पष्टीकरण कंसात दिले आहे.

उदा., अंकाई (किल्ला) **१**.१५ आ

(आ) एकच समान संज्ञा दोन किंवा अधिक विषयांत येत असेल, तर कंसात त्या संज्ञेची ओळख दिलेली आहे. कंसातील स्पष्टीकरणाच्या वर्णक्रमानुसार संज्ञेचा वर्णक्रम दिलेला आहे.

उदा., अंगद (बाहुभूषण) **११**.५३४ आ

अंगद (वालिपुत्र) **१४**.७८३ अ, ८२२ अ

अंगद (शीख गुरू) **५**.१५३ आ; **८**.४८७ आ

ही ओळख विषय, स्थळ, व्यक्ती, मुख्य घटक, प्रक्रिया, प्रकार, संज्ञा अशा अनेक घटकांद्वारे करून दिलेली आहे. तसेच मोठ्या नोंदीत सूचियोग्य एकच निर्देश अनेक वेळा वेगवेगळ्या पृष्ठांवर आला असेल तर त्याच्या पुढे सर्व पृष्ठांचा उल्लेख न करता खंडपृष्ठ व स्तंभ देऊन त्यानंतर कंसात त्याच नोंदीत पुढे पहा म्हणजे 'प' असा उल्लेख केलेला आहे.

उदा., *अंगग्रंथ* (आगम ग्रंथ) **१**.३१७ अ, ५०१ आ (प); **६**.५८४ अ-आ (प)

एकाच विषयाची माहिती *मराठी विश्वकोशा*मध्ये गरजेनुसार वेगवेगळ्या नावांनी आलेली आहे अथवा काही नोंदशीर्षके प्रचलित नावाने खंडांमध्ये वर्णक्रमानुसार घेतलेली आहेत. अशी नोंदशीर्षके ठळक ठशात दर्शवून त्यापुढे 'पहा' असे सुचवून प्रचलित नोंदशीर्षके ठळक ठशात दर्शविली आहेत. त्यापुढे त्याचा खंड (ठळक ठशात) व पृष्ठ क्रमांक दिलेला आहे. नोंदशीर्षक नसलेल्या सर्व संज्ञा साध्या ठशात दिलेल्या आहेत.

उदा., **अंजन–१** : पहा **काजळ ३**.५८३ अ

अंगोरा (स्थळ) : पहा **अंकारा १**.१५ आ

अंतरोपरिदर्श (उपकरण) : पहा सर्वदर्शक दीप **१०**.२२३ आ

प्रस्तुत सूचिखंडाच्या सर्वसाधारण रचनेचा सारांश काढावयाचा झाल्यास पुढील बाबी निदर्शनास येतात. वर्णानुक्रमे संरचित अशा *मराठी विश्वकोशाच्या* बृहत् प्रकल्पात इच्छित विषयाची माहिती कुठे आली आहे याचा निर्देश वाचकांना उपलब्ध करून देणे ही विश्वकोशीय उपक्रमासाठी अत्यावश्यक बाब आहे. विश्वकोशामध्ये येणारी माहिती ही अपरिहार्यपणे अनेक विषयांशी, उपविषयांशी निगडित असते. एखाद्या विषयाची एकाच ठिकाणी, एकाच वेळी संपूर्ण माहिती देणे कोणत्याही विश्वकोशाला शब्दमर्यादेमुळे शक्य होत नाही. उदा., **महाराष्ट्र** ही नोंद *मराठी विश्वकोशाच्या* **१२** व्या खंडातील एक व्याप्तिलेख आहे. या व्याप्तिलेखातून महाराष्ट्राची विस्तृत माहिती देण्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु, *मराठी विश्वकोशाच्या* इतर खंडांमध्येही महाराष्ट्राविषयी पूरक आणि अतिरिक्त माहिती आली आहे. ही माहिती स्वतंत्र रीत्या वाचकांना शोधता येणे अवघड आहे. अशी अतिरिक्त आणि पूरक माहिती या सूचिखंडाद्वारे पूरक संदर्भ म्हणून निर्देशित करण्यात आली आहे, ही या सूचिखंडाची जमेची बाजू आहे. त्यामुळेच प्रस्तुत सूचिखंड हा वाचक, अभ्यासक व संशोधक यांच्यासाठी आंतरविद्याशाखीय आणि सर्वविषयक पद्धतीने उपयुक्त ठरणार आहे.